| | |
|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय<br>रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे<br>फोन नं ०२२-२९४५१००१<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in |

**प्रेस नोट क्र. १४४** **दिनांक ०५/०६/२०२१**

# मीरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयातील भाडेकरु इसमांची माहिती देण्याबाबत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) यांचे आदेश जारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये स्थलांतरित नागरिकांचे वास्तव्याचे प्रमाणात मोठया संख्येने वाढ झालेली आहे. स्थलांतरित इसमांना घर, सदनिका, हॉटेल, जागा, इत्यादी भाडे तत्वावर देतांना संबंधित घरमालक हे भाडेकरुंच्या ओळखीबाबत कोणतीही शहानिशा न करता नागरिकांना घरे भाडयाने देतात व त्यांचेकडून ओळखीबाबत कोणतेही कागदपत्रे घेत नाहीत असे निदर्शनास आले आहे. त्यापैकी काही लोक अवैध व्यवसाय, गुन्हे व समाज विरोधी कृत्यांमध्ये सामील असल्याचे दिसुन आले आहे, अशा काही इसमांमुळे निर्माण होऊ शकणा-या संकटावर प्रतिबंध करण्यासाठी त्यांची माहिती पोलीस ठाणेस अद्यावत करणे आवश्यक आहे.

त्याकरीता मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशनचे हद्दीतील नागरिकांना निवासी क्षेत्रामध्ये सदनिका/फ्लॅट, घर, दुकाने, हॉटेल, जागा इत्यादी भाडेतत्वावर देतांना संबंधित मालकांनी, भाडेकरु इसमांनी, सोसायटीचे चेअरमन व इस्टेट एजंट यांनी संबंधित पोलीस ठाणेस भाडेकरुंबाबतची आवश्यक ती माहिती व कागदपत्रे ०३ दिवसांचे आत ईमेल किंवा टपालाद्वारे देण्याबाबतचे आदेश श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मिरा-भाईंदर वसई-विरार यांनी जारी केले आहेत. सदरचे आदेश हे दिनांक ०७/०६/२०२१ रोजीचे ००.०१ ते दिनांक ०४/०८/२०२१ रोजीचे २४.०० वा.पर्यंत लागु राहतील. सदरची माहिती पोलीस आयुक्ताल यांचे वेबसाईट www.mbvv.mahapolice.gov.in द्वारे देखील पोलीस ठाण्याला देता येईल.

........ooooo.........